## आई व मूल (ओव्या)

शेताच्या सारणीत पाट वाहे झुळझुळ
दुडदुडु अंगणात धावतो लडिवाळ.

वाऱ्याची दांडगाई, नदीवर येती लाटा
बाळाच्या काळजीने माउलीच्या देही काटा.

सोसाट्याच्या वारियाने केळीचे फाटे पान
दु:ख होता बालकास दुखे माउलीचे मन.

धावत्या खारीबाई तुझ्या पुरे येरझारा
झोपतो माझा तान्हा, झाडावरी घे निवारा.

जाई जुईच्या फुलांनो, तुम्ही पसरा सुवासा
अंगाई लागू द्या रे मांडीवरच्या उल्हासा!

आभाळीच्या नक्षत्रांनो, अशी लावू नका टक
दृष्टावेल नंदलाल होईल म्लानमुख.

उगवत्या सूर्या, काय रोखुनी पाहसी?
इंद्राचे राज्य पाही पहुडले माझ्या कुशी.

दसऱ्याचे नवरात्र, देव्हाऱ्यात नऊ माळा
पाठोपाठ नऊ पुत्र, माझ्या होवोत लेकीला !!

## आई आणि मूल (कविता)

मळ्यातल्या माच्यावरी, उभी पाटलाची सून
हाती घेऊन गोफण, दूर पाही न्याहाळून.

'काय बया आखरीत', म्हणे पाटलाची सून
'नाही पाखरू शेतात, कुणा हाणू मी गोफण?'

रोज मारिता गोफण माझे दुखायाचे हात
नाही पाखरू शेतात, कसं याच हंगामात?'

'पाटलाच्या सूनबाई, नको करूस नवल
उभ्या उभ्या माझ्या घरी जा गं घेऊन चाहूल

रानीवनीची पाखरे, होती अंगणात गोळा
माझ्या गं सोनुल्याचा त्यांना लागलासे लळा' !!

## भाऊ बहीण (ओव्या)

लाविता बाळ स्तनी अमृत पाझरते
बैसता जात्यावरी ओवी मंजुळ स्फुरते.

पावसावाचुन आखाड गेला सुना
कुठे माझा गं गुंतला, पाठचा भाऊराणा?

शेतात जोंधळ्याचे कणीस भरदार
तसे मानस उदार भाऊरायाचे !

धावते लगबगा, गंगा भेटाया सिंधुला
मनी मी गं उतावीळ, मिठी घालाया बंधूला !!

घेउनिया सुधाकुंभ गगनात चंद्र आला
अमृताची ओवाळणी धरणीला घालायाला.

बिलोरी आरशात बिंब उमटे गोमटे
भेटता भाऊराया प्रीती अंतरी दाटते.

दीपाची काजळी झडू झडू दूर झाली
पाहता भाऊराया, चिंता सारी ओसरली.

पतीच्या परीस भावाची माया मोठी
द्रौपदीला पाच पती, कृष्ण सोडवी संकटी !

दारी आला भाऊराया, अयोध्येचं रामराज्य
त्रिभुवना लाजवील, आज माझी भाऊबीज !!

## तारक आणि दीपक

**तारक:**

विस्तीर्ण गगन हे गमते मज भीषण
हे 'झगमग' जीवन सुखवि न माझे मन !
जाईन भूवरी शांत दीप होऊनी
मंदिरात मंगल हृदयज्योत उजळून
सेवेत निरंतर, प्रभू, तुमच्या राहीन !

**दीपक :**

दगडाचा ईश्वर दगडाचे मंदीर
हे 'मिणमिण' जीवन गमते मज पामर.
जाईन अंबरी तारक मी होऊनी
चमकेन वैभवी विशाल गगनांगणी
उजळीन जीविता अनंतास पूजुनी !!

## तुझे माझे मन

तुझे माझे मन - जणु यमुनेचे तीर
तुझी माझी प्रीत - वेणू वाजे मनोहर.

तुझे माझे मन - सारवले वृंदावन
प्रीत आपुली साजिरी - तुळशीची गं मंजिरी.

तुझे माझे मन - उंच निर्मळ गगन
तुझी माझी प्रीत - सूरसरितेचा स्त्रोत.

तुझे माझे मन - उमलले पद्मदळ
तुझी माझी प्रीत - दरवळे परिमळ.

तुझे माझे मन - रानीवनीचे हरीण
प्रीत आपुल्या अंतरी - मृगापोटीची कस्तुरी.

तुझे माझे मन - प्रतिभेचा दिव्य क्षण
तुझी माझी प्रीत - अलौकिक भावगीत.

तुझे माझे मन - गगनीचा कृष्णघन
तुझी माझी प्रीत - झरे भूवरी अमृत.

तुझे माझे मन - मन – फुलला मोगरा
तुझी माझी प्रीत – प्रीत – गुंफिला गजरा.

तुझे माझे मन - पाणी भरलेली मोट
तुझी माझी प्रीत - झुळुझुळु वाहे पाट.

तुझे माझे मन - ब्रह्म अनंत निर्गुण
तुझी माझी प्रीत - मूर्त साकार सगुण !

**शब्दांविण आळवीन !**

उषादेवी, संध्याराणी उघडा गं अंतरंग
घेईन मी साठवून उमलते रस रंग.

गीत तुमचे खगांनो, येते सहज आतून
थोडेतरी तयातून मज घेऊ द्या स्फुरण.

पसरून गीतगंध, सुखविशी सकलांना
तुझ्यापासून पवना, मला घेऊ दे प्रेरणा.

फुले – नव्हे विकसल्या जणु सृष्टीच्या भावना
कोमलांनो कानी सांगा, भाव सौंदर्याच्या खुणा.

उसळत्या लहरींनो, तुम्ही नाचा थयथय
मनी मुरवू द्या मला सम, ताल आणि लय.

मध्यरात्री एकांतात, अंतरीच्या गाभाऱ्यात
शब्दांविण आळवीन माझे गोड भावगीत !

## तारांगण

अनंताच्या सरोवरी धरणीने केले स्नान
निळे पातळ आपुले स्वच्छ टाकिले धुवून.

वाऱ्यावर वाळणारे वस्त्र जावे न उडून
छोटे मोठे गोल गोटे दिले त्यावर ठेऊन !!

## **उदबत्ती**

वणवण फिरतो पोटासाठी
एक चिमुकली पेटी हाती
गोड लाघवी भाषा ओठी
वृद्ध – उलटली ज्याची साठी.

सांज सकाळी रस्तोरस्ती
विकीत असतो आगरबत्ती
पाहुनी दाटे सुगंध चित्ती
जळती फिरती ती उदबत्ती !!

## सूर्याची स्वाक्षरी

एक चिमुकला मेघ धिटुकला
उभा कधीचा पश्चिमदारी

घरा परतता रवीची स्वारी
मिळवी त्याची वंद्य स्वाक्षरी.

हर्षभराने त्या मेघाचे
रूप जाहले रम्य, रुपेरी !

## आस्तिक आणि नास्तिक

देवावर ठेवा पुरता विश्वास
किंवा अविश्वास पूर्ण हवा
भले काही होता देवाजीची स्तुती
दोष त्याचे माथी संकटात |

देवाचे खेळणे करितो मानव
भक्ती ऐसे नाव त्यास देई
बापासंगे जणू खेळतो बालक
विश्वाचा पालक पाहतसे |

स्वार्थासाठी ज्यांचा देवावर भाव
आस्तिक हे नाव त्यांचे नव्हे
माझ्यामध्ये आहे इंधन स्पंदन
तोडीन बंधन आत्मबळे |

मीच आहे माझा तारक मारक
सत्य हेच एक त्यास ठावे
भासमय देव ज्याने अव्हेरीला
नास्तिक त्याला म्हणो नये |